सुपर स्पेस,
सुपर ग्रॅव्हिटी, सुपर सिमेट्री
इत्यादींच्या जमान्यात
दख्खनची राणीही
गणिताचा नवा प्रकार मांडत आहे.

# सुपर फास्ट ट्रेनचे सुपर-गणित

"जपानी गाड्यात बसला नाहीत तोपर्यन्त तुम्ही खरी फास्ट ट्रेन पाहिलीच नाही" हे वाक्य बोलणारे गृहस्थ अनेकवेळा जगप्रवास केलेले जेटसेटर असतील हा तुमचा समज चुकीचा आहे. उत्तरेस मालाड ते दक्षिणेस काळा घोडा एवढीच झेप असलेली ही व्यक्ती तुम्हाला पु. लं.च्या 'अपूर्वाई'त भेटली होती. पु. ल. पुण्यात स्थायिक झाल्यावर हिच्या मैत्रीतून सुटले आणि मी सापडलो.

"जपानी गाड्या पाचशे मैल वेगाने जातात..."

"मैल की किलोमीटर ?" मी मधेच पृच्छा केली.

"किलोमीटर असतील आणि पाचशे नसले तर तीनशे असतील. मुद्दा तो नव्हे." मालाडकर पुढे सांगू लागले. "ह्या गाड्या वेळापत्रकास धरून चालतात. जर एखादी गाडी लेट झाली तर स्टेशनाबाहेर पडताना प्रवाशांना तिकिटाच्या पैशाचा काही भाग परत केला जातो."

"खरंच ?"

"मग मी काय सांगतोय तुम्हाला ? अहो, तो टी. सी. कॅशची लहान लहान पुडकीच घेऊन उभा असतो. एक तास लेट तर इतके येन, दोन तास लेट तर त्याच्या दुप्पट..." ह्या विषयावर एखादा याकुशिता किंवा हासेगावासुध्दा त्यांच्याशी वाद घालू शकला नसता. मग मी काय बोलणार ? पण मालाडकर मला स्वस्थ बसू देणार नव्हते. त्यांनी विचारले "तुमचे ब्रिटन तर अजून कोळशाच्या आणि वाफेच्याच युगात असणार ?"

वास्तविक ब्रिटन काही 'माझे' नाही. मी नुकताच तेथे वर्षभर वास्तव्य करून आलो इतकेच. पण ह्या प्रश्नातील विधान खोडून काढणे आवश्यक होते. मी उत्तरलो "इंटरसिटी--१२५ ह्या नावाखाली तेथे फास्ट गाड्या आहेत. त्या ताशी १२५ मैल वेगाने धावतात. याहून वेगवान अॅडव्हान्स्ड पॅसेन्जर ट्रेन पण लवकरच तेथे सोडणार आहेत."

अपेक्षित उत्तर मिळाले नाही की तिकडे दुर्लक्ष करण्याची माझ्या 'मित्रा'ची लकब मला माहीत होती. मालाडकरांनी विषयांतर करून एकदम भारताकडे गाडी वळवली. "आपल्याकडे पण आता सुपर फास्ट ट्रेन्स आल्यात. त्यातून जायला सरचार्ज लागतो. पण त्यामुळे वेळ वाचतो. शिवाय सर्व जागा रिझर्व्ह्ड असल्याने व्यवस्थित प्रवास करता येतो."

"मुम्बई-पुणे प्रवासाकरता अशी एक गाडी पाहिजे बुवा" – मी.

"आहेच की, डेक्कन क्वीनलाच सुपर फास्टचा दर्जा दिलाय.

## जयंत नारळीकर

तीन तासाच्या आत जाते ती."

"खरंच ? पूर्वी तिला सव्वातीन ते साडेतीन तास लागत असत. मला आता बऱ्याच वेळा पुण्याला जायचंय, तेव्हा हीच गाडी वापरीन म्हणतो."

"होय हीच गाडी वापरा तुम्ही! तिच्या तुलनेत बाकीच्या गाड्या म्हणजे निव्वळ बैलगाड्या आहेत बैलगाड्या !"

* * *

अनेक वेळा जाणाऱ्यांना महिन्याचा पास सोयीचा पडतो हे कळल्यावर मी पुण्याचा पास काढायला गेलो. पाससाठी फॉर्म भरणे, फोटोच्या सर्टिफाइड कॉपीज आणणे इत्यादी लाल फितीचे बरेच प्रकार असतील त्यांना तोंड देण्याच्या तयारीने मी व्ही. टी. वर गेलो आणि आश्चर्याचा एक गोड धक्का बसला. खिडकीजवळ क्यू नाही. पाच मिनिटांच्या आत मला पास मिळाला.

पण ह्यापुढले अनुभव 'गोड' ह्या सदरात बसणारे नव्हते.

पास घेऊन पुण्यासाठी डेक्कनवर जागेचे आरक्षण करायला गेलो. कारण अनुभवी लोकांनी (म्हणजे प्रत्यक्ष पासहोल्डर असलेल्यांनी –मालाडकरांनी नव्हे) सांगितले होते : 'पुष्कळ आधी जाऊन जागा पकडायची आणि ती टिकवण्याची शामत असली तरच पासहोल्डर्सच्या डब्यातून प्रवास करा. नाहीतर जागा रिझर्व्ह करून निश्चिंतपणे जा."

मी दुसरा मार्ग पत्करला. मनात विचार केला. तीनशेहून जास्त किमतीच्या पासाचे काम पाच मिनिटात झाले तर चवदा रुपयांच्या आरक्षणासाठी किती वेळ लागणार ?

आरक्षणाचा फॉर्म भरून योग्य खिडकीकडे वळलो आणि क्यू चे दर्शन झाले. क्यूमध्ये दहा माणसे असावीत. आपला बहुतेक अर्धातास इथे मोडणार असे गणित मनाशी मांडून मी घड्याळाकडे पाहिले. ९-३५ झाले होते. पण गृहीतके बरोबर नसली तर प्रमेय चुकते या गणिती तत्त्वाचे मला विस्मरण झाले होते. माझी गृहीतके परदेशातील अनुभवांवर आणि नुकत्याच आलेल्या पासाच्या खिडकीवरील अनुभवावर आधारलेली होती. तरी वेळ फुकट जाऊ नये म्हणून मी मनातल्या मनात माझ्या संशोधनातील एका प्रश्नाचा विचार करू लागलो.

क्यू मुंगीच्या गतीने पुढे सरकत होता असे म्हटले तर मुंग्यांचा अपमान होईल. विचारांच्या तंद्रीतून मधेच जाग आली तेव्हा घड्याळात १०-३० झाले होते आणि अजून चार माणसे पुढे होती. शिवाय डावी-उजवीकडून मधेच घुसणारी वेगळी-- पण क्यू वाले अशांची दाद लागू देत नव्हते ही एक समाधानाची गोष्ट वाटली. इतक्यात माझ्या मनात एक अभद्र विचार चमकला.

मी नुकताच व पहिल्यांदाच पास काढलेला असल्याने ओळखपत्रावर फोटो चिकटवलेला नव्हता. 'अपूर्वाई'त वाचलेला प्रसंग आठवला. प्रवासाला जाण्यापूर्वी देवी टोचून घ्यायला आणि त्याचा दाखला घ्यायला पु. लं.ना अशाच क्यूमध्ये उभे राहावे लागले होते आणि शेवटी त्यांची पाळी आल्यावर पासपोर्ट नाही म्हणून त्यांना (देवी न टोचलेले) हात हालवीत परत जावे लागले. आपल्यावर ही पाळी आली तर ? ओळखपत्र आणि फोटो हे परस्पराला चिकटलेले नाहीत ह्या कारणास्तव जर आपल्याला आरक्षण नाकारण्यात आले तर ? तर ही तासाभराची क्यूमधली तपश्चर्या व्यर्थ जायची.

प्रश्नाची शहानिशा करायला वेळ नव्हता. त्यापेक्षा फोटो चिकटवलेला बरा. मागच्या आणि पुढच्यांना माझी जागा ठेवायला सांगून मी क्यू मधून बाहेर पडलो. सुदैवाने शेजारची खिडकी रिकामी होती. तिथल्या महिलेला मी विचारले "मला थोडा डिंक हवाय. तुमच्या ऑफिसमध्ये मिळू शकेल का ?"

"डिंक ?" त्या बाई आश्चर्याने किंचाळल्या. व्ही. टी.च्या तिकिट विंडोवर डिंक मागणारा मी पहिलाच असामी असेन. मी माझ्या विनंतीचा पुनरुच्चार केला.

"आमच्याकडे डिंक आहे पण त्याने काही चिकटत नाही" त्यांनी मला निरुत्साही करायचा प्रयत्न केला. पण मी एवढ्याने डगमगणारा नव्हतो.

"हरकत नाही ! मी वापरून तर पाहतो."

त्या बाईंनी असहायतेने आपल्या शेजारच्या महिलांशी संपर्क साधला. "अहो, हे गृहस्थ डिंक मागतायत. काय करावे ?" तिघींनी मसलत करून शेवटी मला मागच्या दाराने त्यांच्या ऑफिसमध्ये पाठवले. तेथे एका कर्मचाऱ्याने भल्या मोठ्या ब्रशान फोटोला डिंक फासला आणि कार्डावर फोटो ठेवून दाबला.

फोटो चिकटला आणि माझा जीव भांड्यात पडला.

मी क्यू शी परत आलो तेव्हा १०-४५ झाले होते. अजून दोघंजण क्यू मध्ये माझ्या पुढे होते. (माझ्या मागे तर आता क्यू ची लांबी पुष्कळ वाढली होती, आणि 'लंच ब्रेक'पर्यन्त आपले काम होईल का नाही याबाबतीत मागचे लोक चिंता करायला लागले होते.) तिकिट व आरक्षण घेणारे तसेच घेतलेले परत करणारे, दोन्ही प्रकारचे लोक एकाच क्यूमध्ये असल्याने वेळ लागतो असे समजले.

माझी 'टर्न' आली तेव्हा तिकिट विंडोमधली महिला पास बघून म्हणाली "अहो, तुमचा पास आउट ऑफ डेट झाला."

मी हादरलो. आजच तर पास घेतला. का मी महिनाभर क्यूमध्येच उभा होतो ? पण बाईंच्या पुढल्या वाक्याने जिवात जीव आला "नाही ! ठीक आहे. मी तारीख चुकीची वाचली."

आरक्षण मिळवून मी बाहेर आलो तेव्हा ११-०५ वाजले होते. माझे गणित तिपटीने चुकले होते.

* * *

डेक्कन क्वीन तीन तासांच्या आत मुम्बई-पुणे प्रवास करते हे मालाडकरांचे विधान त्यांच्या इतर ठामपणे केलेल्या विधानांप्रमाणेच असणार हे माझ्या लक्षात यायला पाहिजे होते. व्ही. टी. हून ५-१० ला निघणारी डेक्कन क्वीन पुणे स्टेशनवर केव्हा पोचते अशी चौकशी करता उत्तर मिळाले, "८-३५."

मी गाडीत शेजारच्या प्रवाशाला विचारले "पूर्वी ही गाडी इतका वेळ घेत नव्हती असे मला वाटते-- खरे ना ?"

"होय ! पूर्वी ही गाडी ८-२० ला पोचायची. पण लोकाग्रहास्तव तिला आणखी दोन डबे जोडण्यात आले. म्हणून तिचा वेग कमी

(पान पाचवर)

# उपरोधाच्या फंदात पडू नका !

(पान एकवरून)

झाला."

"आणि तिच्यातून प्रवास करायचा चार्ज मात्र वाढला."

पण एखाद्या प्रकल्पावर किती खर्च करायचा यावर समितीमध्यें कित्येकदा १०० रुपयांवरून घासाघीस होतं आणि प्रत्यक्षात खर्च १०००-२००० रु.नी वाढतो-- तसं झालं. डेक्कन क्वीन ८-२० ऐवजी ८-३५ ला का पोचते याची चर्चा करता आम्ही पुण्याला पोचलो तेव्हा १० वाजून गेले होतं.

साध्या एक्स्प्रेस गाड्या (मालाडकरांच्या बैलगाड्या) मुम्बई-पुणे अंतर पावणेपाच तासांत पार करतात. म्हणजे ह्या सुपर फास्ट गाडीने तेवढाच वेळ घेतला. शिवाय अनिवार्य आरक्षणासाठी माझा क्यूमध्यें दीड तास गेला. त्यात मिळवा व्ही. टी.ला आरक्षण मिळवण्यासाठी जायला लागणारा वेळ-- बसनें अर्धा तास तरी. एकशे वीस मैल जायला ६-७ तासाचा वेळ मोडावा ? आणि वर 'सुपर फास्ट'-साठी १४ रुपयाचा भुर्दन्ड.

मी ह्या गाडीनें आणखी प्रवास करून पाहिला. त्यावरून नाणं फेकीत 'हेड' किती वेळा वर पडेल तितक्या प्रमाणात ही सुपर फास्ट गाडी वेळेवर जात असावी असे वाटतें. इतरांचा अनुभव कदाचित ह्यापेक्षा सुखद असेल. एका स्कूटरवाल्यानें पुणे-दादर प्रवासात ह्या गाडीला मागे टाकलें असें वाचलें होतें-- ती घटना असंभवनीय वाटत नाही.

* * *

जास्त वैताग आला की मी माझ्या एका स्थितप्रज्ञ मित्राकडे धाव घेतो. दख्खनच्या राणीबद्दलचें माझें गाऱ्हाणे मी त्यांच्यापुढें मांडून म्हटलें :

"मी केंब्रिजमध्यें शिकत असताना काही काळ लंडन-केम्ब्रिज गाड्या अनियमित धावत असत. त्यावेळी युनिव्हर्सिटीच्या प्रीचरनी-- त्यांचे नाव रेव्हरंड मर्व्हिन स्टॉकवूड-- चर्चमध्यें सांगितलें की ह्या गाड्यांची वेळापत्रकें म्हणजे 'फिक्शन'चा उत्तम नमुना आहे. त्या विधानाला वर्तमानपत्रात प्रसिध्दी मिळाली आणि रेल्वेनें त्याची दखल घेऊन गाड्यांमध्यें नियमितपणा आणला."

ह्यावर स्थितप्रज्ञ म्हणाले "तुम्ही स्वत:ला स्टॉकवूड समजू नका आणि सेन्ट्रल रेल्वेला ब्रिटिश रेल तर मुळीच समजू नका. तुम्ही जर आपलें गाऱ्हाणें वर्तमानपत्रात मांडलें तर काही दिवसांनी रेल्वेचे जनसंपर्काधिकारी पुढील धर्तीवर पत्र लिहितील : १) नारळीकरांनी ज्या दिवशी प्रवास केला नेमका तेव्हाच ही गाडी उशीरा गेली. एरव्ही ही ९० टक्के वेळेवर जाते. २) लायनीवर काम चालू असल्यानें सध्या गाड्यांना उशीर होतो-- एरव्ही त्या वेळेवर जातात. ३) प्रवाशांच्या आग्रहावरून आम्ही गाडीची लांबी वाढवली. त्यामुळें ती उशिरा जाते याला आमचा नाइलाज आहे-- प्रत्यक्षात सुधारणा काही घडणार नाही."

"ठीक आहे. मग मी एक उपरोधात्मक पत्र त्यांना लिहितो म्हणजे माझा अंतरात्मा शांत होईल. मी त्यांना अशी सूचना करतो की ह्या विलक्षण सुपर फास्ट ट्रेनवर प्रवास करण्याचे सुख प्रवाशांना अधिक काळ लाभावं यासाठी गाडीची प्रवासाची वेळ सहा तास करावी आणि ह्या सुखाबद्दलचा सरचार्ज २५ रु. करावा." मी तावातावानें उद्गारलो. "पुण्याच्या सायकलस्वारांनासुध्दा आपल्यावर मात करण्याचें श्रेय ह्या गाडीनें का देऊ नये ?"

स्थितप्रज्ञ किंचित विचलित झालेले दिसले. पण स्वत:ला सावरून म्हणाले "असे तर मुळीच करू नका. आपल्या नोकरशाहीला विनोद, उपरोध वगैरे कितपत कळतात, चालतात माहीत नाही. तुमची सूचना खरोखरच अमलात आणली जाईल !"

"मग मी करू तरी काय ! तुम्ही कसे आपलें मन शांत ठेवता ?" मी रडकुंडीला येऊन विचारलें.

"मी तुम्हाला माझी ट्रिक सांगतो. जर कुठें वैताग देणारी घटना घडली तर जगात त्याहून अधिक वैताग देणाऱ्या घटनांची आठवण काढतो आणि त्यामुळें एकदम बरें वाटतें. उदाहरणार्थ, इदी अमीनची कृष्णकृत्ये वाचून उबग आली की हिटलरची आठवण काढायचो. बॉयकॉटचें स्लो बॅटिंग पाहून (किंवा ऐकून) कंटाळलो की बार्नाकल बेलो डोळ्यासमोर आणायचो. मुम्बईचा ट्रॅफिक अनियमित वाटला की दिल्ली-कलकत्याची स्थिती डोळ्यापुढें आणतो..."

"मग मी आत्ता कशाची आठवण काढू ?"

"अजून तुम्हाला नाही कळलं ? बर मी तुम्हाला हिंट देतो. अशी कुठली प्रवासी सेवा आहे जी स्वत:ला मुलाचा बाप आणि प्रवासी म्हणजे मुलांचें बाप असे समजून आचरण करते ?"

"इंडिअन एअरलाइन्स" माझ्या डोक्यात प्रकाश पडला आणि दख्खनच्या राणीवरचा माझा राग मावळला... माहीसा झाला.